# महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**मुख्य कार्यालय:**
**व्यवस्थापकीय संचालक, ममविम,एन.के.एम. इंटरनॅशनल हाऊस, तिसरा मजला, १७८ बॅकबे रिक्लेमेशन, बी.एम. चिनॉय मार्ग, मुंबई- ४०००२०, टेल/फॅक्स नं.(०२२) २२०२६०१४, २२०२५०२२**

## निविदा/ई-निविदा सुचना (दुसरी वेळ)

निविदा नोटीस नं- ममविम/तां/केज कल्चर/ ३७१/२०१६ दि. २६/१२/२०१६

महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडुन खालील नमुद केलेल्या जलाशयांमध्ये निर्धारित केलेल्या जलक्षेत्रात पिंजरा पध्दतीने मत्स्यपालन प्रकल्प उभारण्यासाठी इच्छूक निमशासकीय, खाजगी, वैयक्तिक, कंपनी, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय फेडरेशन आणि इतर संस्थाकडून निविदा/ई- निविदा मागविण्यात येत आहे. **प्रत्येक जलाशयासाठी निर्धारीत जलक्षेत्रासाठी एका पेक्षा जास्त निविदा भरू शकतात. एक निविदाधारक १५०० चौमी जलक्षेत्रापेक्षा त्याच्या पटीत जलक्षेत्रासाठी एकाच निविदेत अनेक जलक्षेत्रासाठी एकाच जलाशयातील निविदा भरू शकतात.** जर जलाशयाच्या निर्धारीत जलक्षेत्रासाठी कमी निविदा प्राप्त झाल्या तर उर्वरित जलक्षेत्र इच्छूक निविदा धारकास उपलब्ध करुन दिले जाईल.

| | | | | | या जलक्षेत्रासाठी निविदा मागवण्यात येत आहेत. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | जलाशयाचे नाव | जिल्हा | जलक्षेत्र | निर्धारीत उपयुक्त १%जल क्षेत्र | एका प्रकल्पासाठी एकुण उपलब्ध जलक्षेत्र | एकुण शिल्लक प्रकल्प संख्या | एकुण शिल्लक उपलब्ध जलक्षेत्र (हेक्टर) |
| १ | पेंच | नागपूर | १६०५ | १६.०५ | १५०० चौमी | ९९ | १४.८५ |
| २ | बोर | वर्धा | ८०० | ८.०० | १५०० चौमी | ४८ | ७.२० |
| ३ | धाम | वर्धा | ५०० | ५.०० | १५०० चौमी | ३१ | ४.६५ |
| ४ | नलेश्वर | चंद्रपूर | २८८ | २.८८ | १५०० चौमी | १९ | २.८८ |
| ५ | चारगाव | चंद्रपूर | ७४६ | ७.४६ | १५०० चौमी | ५० | ७.४६ |
| ६ | खेकरानाला | नागपूर | २५० | २.५० | १५०० चौमी | १२ | १.८० |
| ७ | अप्पर पैनगंगा | यवतमाळ | ६६६० | ६६.६० | १५०० चौमी | ४४२ | ६६.३० |
| ८ | सायखेडा | यवतमाळ | ४९५ | ४.९५ | १५०० चौमी | ३३ | ४.९५ |
| ९ | ईरई | चंद्रपूर | ३६६० | ३६.६० | १५०० चौमी | २४४ | ३६.६० |
| १० | मुळानगर | अहमदनगर | ३५११ | ३५.११ | १५०० चौमी | २२६ | ३३.९० |
| ११ | तारळी | सातारा | १९६ | १.९६ | १५०० चौमी | ३ | ०.४५ |
| १२ | पवना | पुणे | १५८४ | १५.८४ | १५०० चौमी | ९४ | १४.१० |
| १३ | डिंबे | पुणे | १२७८ | १२.७८ | १५०० चौमी | ८३ | १२.४५ |
| १४ | अरुणावती | यवतमाळ | २३५० | २३.५ | १५०० चौमी | १५४ | २३.१० |
| १५ | इटियाडोह | भंडारा | ४८३२ | ४८.३२ | १५०० चौमी | ३१६ | ४७.४० |
| १६ | पुजारीटोला | गोंदिया | १८३१ | १८.३१ | १५०० चौमी | ११६ | १७.४० |
| १७ | असोलामेंढा | चंद्रपूर | १७४६ | १७.४६ | १५०० चौमी | ११२ | १६.८० |
| | एकुण | | **३२३३२** | **३२३.३२** | | **२०८२** | |

पिंजरा आकार ६ X ४ X ४ मीटरचा एक पिंजरा या प्रमाणे अशा ४८ मत्स्यपालन पिंजऱ्यांसाठी १५०० वर्ग मीटर (०.१५ हे.) जलक्षेत्र उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ज्या निविदाधारकांचे पिंजऱ्याचा आकार जास्त आहे त्यांनी निर्धारीत जलक्षेत्रात पिंजऱ्याची संख्या कमी करणे आवश्यक आहे. निविदा धारकास जास्त जलक्षेत्र आवश्यक असल्यास त्यांना ०.१५ हे. च्या पटीत जलक्षेत्र उपलब्ध करुन देण्यात येईल. **एकाच निर्धारीत जलक्षेत्रासाठी अनेक निविदा न भरता केवळ एक निविदा भरुन त्यात एक किंवा अनेक युनिट त्यात नमुद करण्यात यावे व त्यासाठी प्रकल्पाच्या पटीत बयाना रक्कम रु. १०,०००/- प्रमाणे भरणे आवश्यक आहे.**

**पिंजरा पध्दतीने मत्स्यपालन प्रकल्पासाठी १५०० चौमी जलक्षेत्राची न्यूनतम ठेका रक्कम वार्षिक रु.५०,०००/- निर्धारीत करण्यात आलेली आहे. यापेक्षा कमी दराची निविदा स्विकारण्यात येणार नाही.**

निविदाधारकांनी तांत्रिक निविदेसोबत केज कल्चर चा संपूर्ण प्रकल्प प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तावाशिवाय येणारी निविदा रद्द करण्यात येईल. महामंडळाच्या मुख्य कार्यालयातून निविदा संच उपलब्ध होतील. निविदेची रक्कम महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाच्या मुख्य कार्यालयात रु. १,०००/- ची दर्शनी हुंडी महामंडळाच्या नावे व मुंबई येथे देय असलेली दि. १६/०१/२०१७ पूर्वी जमा करुन निविदासंच उपलब्ध करुन घ्यावे अथवा रोखीने भरुन, निविदासंच उपलब्ध करुन घ्यावे.

प्रत्येक निविदेसोबत प्रती युनिट/प्रकल्पानुसार प्रत्येकी रु. १०,०००/- ची दर्शनी हुंडी महामंडळाच्या नावे व मुंबई येथे देय असलेला तांत्रिक निविदा सोबत बयाना रक्कम जमा करावी लागेल किंवा महामंडळाच्या मुख्य कार्यालयात रोखीने जमा करावी व त्याची पावती तांत्रिक निविदेसोबत सादर करावे. बयाना रकमेशिवाय निविदा सादर केल्यास ती निविदा रद्द करण्यात येईल.

महामंडळाच्या मुख्य कार्यालयात निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. १६/०१/२०१७ रोजी दु. ५.०० वाजेपर्यंत राहील. महामंडळाच्या मुख्य कार्यालयातच दि. १७/०१/२०१७ रोजी स. ११.०० वाजता निविदाधारकाच्या समक्ष उघडण्यात येतील. याबाबत अतिरीक्त माहिती, गरज असल्यास, महामंडळाच्या वरील पत्त्यावर कार्यालयीन दिवशी व वेळेत उपलब्ध होईल.

कोणत्याही कारणाशिवाय, कोणतीही किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कसल्याही प्रकारचा पत्र व्यवहार ग्राह्य धरला जाणार नाही.

व्यवस्थापकीय संचालक